सदरक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग
वार्ताहर कक्ष,
पोलीस आयुक्त, यांचे कार्यालय,
डॉ. डी. एन. रोड, मुंबई-४००००१.

दूरध्वनी क्र. २२६२०३३२
Email I.D. – pressroom.mum@mahapolice.gov.in

---

जा.क्र.६२७ /वार्ता.कक्ष/२०२१ दिनांक :-२५/११/२०२१

# —: प्रेस नोट :—

साकीनाका पोलीस ठाणे, मुंबई येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी साकीनाका पोलीस ठाणे गु.र.क्र.९३७/२०२१, कलम ३०२, ३७६ (२) (एम), ३७६(अ) भा.द.वि, सह ३७ (१), १३५ म.पो. का. सह ३ (१) (डबलु),३ (१) (व्ही) अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा या कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. जनतेचे लक्ष असलेल्या सदर गुन्ह्या मधील आरोपीताचे विरुध्द सबळ पुरावा गोळा करून, उत्कृष्ट तपास करुन १८ दिवसात दोषारोप पत्र दाखल करुन चांगली कामगिरी केल्यामुळे तपासी अधिकारी श्रीमती ज्योत्स्ना रासम, सहाय्यक पोलीस आयुक्त, डी.एन.नगर विभाग, मुंबई व साकीनाका पोलीस ठाणे, मुंबई मधील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी चांगली कामगिरी करून प्रशंसनीय कामगिरी केली व जनमाणसातील मुंबई पोलीसांची प्रतिमा उंचविण्याचे सर्वोत्कृष्ट कार्य केले आहे.

यांनी केलेल्या या प्रशंसनीय व उल्लेखनीय कामगिरीबद्दल दि २४/११/२०२१ रोजी १७.०० वा मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस सह आयुक्त (का व सु), बृहन्मुंबई यांनी खार जिमखाना सभागृह, मुंबई येथे पोलीस उप आयुक्त परिमंडळ ९ मुंबई अंतर्गत पोलीस अधिकारी व अंमलदार यांना विशेष पारितोषिक व प्रशस्तीपत्र देऊन गौरव केलेला आहे. सदर वेळी मा. श्री.संदीप कर्णिक,अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, मा.श्री. मंजुनाथ सिंगे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ९ यांचे उपस्थितीत सोहळा पार पडला.

(चैतन्या एस.)
पोलीस उप आयुक्त (अभियान),
जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, मंबई

Scanned with CamScanner